# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाला सादर करावयाचा नियमित कार्यक्रमाचा व विषेश शिबिराचा अहवाल

**2019–20**

**"NOT ME BUT YOU"**

शिक्षा मंडळ वर्धा व्दारा संचालित

गो. से. अर्थवाणिज्य महाविद्यालय, नागपूर

राष्ट्रीय सेवा योजना पथक

(विद्यापीठाव्दारे पुरस्कार प्राप्त)


कार्यक्रम अधिकारी

डॉ. ए. बी. पटले

राष्ट्रीय सेवा योजना समिती

प्राचार्य / अध्यक्ष

डॉ. एन. वाय. खंडाईत

राष्ट्रीय सेवा योजना समिती

# गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय नागपूर

## "राष्ट्रीय सेवा योजना पथक"

## कार्यक्रम अहवाल

### २०१९-२०

राष्ट्रीय सेवा योजना समिती अध्यक्ष व मा. प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी सत्र २०१९-२० साठी राष्ट्रीय सेवा योजना समितीची स्थापना खालील प्रमाणे केली.

| | |
|---|---|
| • **प्रा. डॉ. ए. बी. पटले** | **कार्यक्रम अधिकारी** |
| • **प्रा. डॉ. राशी अरोरा** | **महिला कार्यकम अधिकारी** |
| • **प्रा. डॉ. वाय. एस. केदार** | **सहायक कार्यक्रम अधिकारी** |
| • **प्रा. डॉ. बी. एस. चचाने** | **सदस्य** |
| • **प्रा. डॉ. प्रिया मुरारकर** | **सदस्य** |
| • **प्रा. डॉ. एम. आर. पांडे** | **सदस्य** |
| • **प्रा. पल्लवी श्रीवास्तव** | **सदस्य** |

राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे सत्र २०१९-२० हया शैक्षणिक सत्रात पुढील प्रमाणे नियमित कार्यकम राबविण्यात आले.

### १. स्वच्छ भारत ग्रीष्मकालीन इंटनशीप उपक्रम २०१९ :-

"महात्मा गांधीजींच्या १५० व्या जन्म शताब्दी निमित्त स्वच्छ भारत हीच त्यांना योग्य आदरांजली ठरेल" असे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींनी राजपथ, नवी दिल्ली येथे ०२ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात करताना म्हटले, आणि स्वच्छ भारत अभियानाला देशव्यापी चळवळीचे स्वरूप देण्यात आले. स्वच्छतेच्या या चळवळीचे नेतुत्व करताना जनतेने महात्मा गांधींचे स्वच्छ व निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करावे, असे जनतेला आव्हान केले. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदींनी स्वतः हाती झाडू घेऊन दिल्लीतील मंदीर मार्ग, पोलीस ठाण्याचा परिसर स्वच्छ केला. रस्त्यावर लोकांनी घाण करू नये व इतरांनाही त्यापासुन परावृत्त करावे, असे आव्हान केले. जनतेला पंतप्रधानांनी **"ना गंदगी करेंगे, ना करने देंगे"** चा बीज मंत्र दिला. याप्रसंगी पंतप्रधानांनी नऊ व्यक्तींन स्वच्छता मोहिमेचे दूत म्हणून घोषीत केले तसेच या व्यक्तींनी आणखी नऊ व्यक्तींना स्वच्छतेचे दूत बनवण्यास सांगितले. जनतेच्या सहभागामुळे स्वच्छ भारत अभियानाचे रूपांतर एका राष्ट्रीय चळवळीत झाले. या अभियानामूळे लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे. लोकांच्या सक्रीय सहभागामुळे महात्मा गांधींचे स्वच्छ भारत हे स्वप्न लवकरच आकार घेण्याच्या मार्गावर आहे. पंतप्रधानांनी स्वतःच्या व कृतीतून जनतेला स्वच्छ भारत अभियानाचा संदेश दिला आहे. 'मन की बात' च्या ४३ व्या आवृत्तीवर राष्ट्राला संबोधित करतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाशी संबंधित सरकारच्या विशेष ग्रीष्मकालीन इंटर्नशिपची घोषणा केली. त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून, एनसीसी कॅडेटस, एनएसएस स्वयंसेवक, नेहरू युवा केंद्राचे विद्यार्थी आणि इतर तरूणांना समर इंटर्नशिपमध्ये सामील होण्यासाठी आणि स्वच्छ भारताला योगदान देण्यास आव्हान केले. तीन संयुक्तपणे

डिझाइन केलेले- १) पेयजल आणि स्वच्छता, २) मानव संसाधन विकास आणि ३) युवक अफेयर्स आणि क्रीडा ७० तासांच्या अनुभवात्मक समर इंटर्नशिप प्रोग्रामने विद्यार्थ्यांना/स्वयंसेवकांना एक किंवा अधिक गावांना भेट देण्याची आणि कार्यात योगदान देण्यासाठी त्यांच्या निवडीच्या क्रियाकलापांची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण अनुभव देण्याची अपेक्षा आहे परंतु स्वच्छ आणि निरोगी भारत सुनिश्चित करण्याच्या सरकारव्दारे उचलल्या गेलेल्या विद्यमान उपायांची देखील आशा आहे. माननीय पंतप्रधान मोदींनी सांगितले की, "अशा तरूणांना योगदान देऊ इच्छितो, समाजात ज्यांना बदल घडवून आणि या प्रकियेत काहीतरी शिकण्याची संधी आहे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाव्दारे सत्र २०१८-१९ मधे दिनांक २१ जून २०१८ ते ३१ जुलै २०१८ पर्यन्त उन्हाळी स्वच्छ भारत अभियानान्तर्गत नागपुर शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी तसेच महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या नागाझरी / पिपळधरा या गांवात १०० तास काम केले होते. त्या कार्याचा सकारात्मक प्रभाव आम्हाला दिसून आला. ह्या प्रेरणेतून २०२० यावर्षी सुध्दा आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकानी उन्हाळी स्वच्छ भारत अभियानान्तर्गत दिनांक २१ जून २०१९ पासून ३१ जुलै २०१९ पर्यन्त ७० तास कार्य केले आहे. आमच्या महाविद्यालयाच्या वतीने दत्तक ग्राम नागाझरी आणि पिपळधरा ह्या दोन गावात तसेच फुटाळा तलाव, महाविद्यालय परिसर, फेन्डस कॉलोनी, काटोल रोड, रामदास पेठ, अंबाझरी रोड, विद्यापीठ परिसर इत्यादी ठिकाणी स्वच्छता अभियान अंतर्गत विविध स्वच्छतेसंबंधीचे कार्य पूर्ण केले आहे. सदर कार्यक्रम माननीय प्राचार्य डॉ. एन वाय. खण्डाईत यांच्या दिशानिर्देशानुसार नोडल अधिकारी डॉ. ए. वी. पटले यांच्या सहकार्याने पार पाडण्यात आले.

रासेयो स्वयंसेवक प्रवीण साखरे, विशाल शाहू, खुशबु डाखोळे, रार्जेद्र साहु, विशाल उईके, इंद्रजीत मुखी, मंथन राऊत, सिध्दांत सहानी, रेवंत परियार, दिगंबर नागपुरे, रियाझ पठान, प्रियंका अलोने, राकेश पेंढारकर, निखील राऊत, सचिन साहु, रोशन मोंढे, यांचे सहकार्य प्राप्त झाले.










## २. आंतरराष्ट्रीय योग दिवस :-

गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत २१ जुन २०१९ रोज शुक्रवार ला आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये जवळ जवळ NSS चे १०० विद्यार्थी आणि NCC चे ५० आणि Sports ५० असे एकूण २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून योग शिक्षक प्रा. रविंद्र रामटेके यांनी योगासन आणि प्राणायमचे महत्व सांगीतले. तसेच आरोग्याच्या व रोजगाराच्या दृष्टिने योगासन किती महत्वाचे आहे. हे सांगीतले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालययतील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम शिस्तबंध्द व उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला व योग बद्दल संदेश देण्यात आला.

''जर प्रत्येकानी नियमित योग केला तर आपला देश हा आजार मुक्त होईल.'' असे आव्हाण प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी उपस्थितांना केले.





## ३. वृक्ष दिंडी :- २ जुलै २०१९ रोज मंगळवार

''झाडे लावा, झाडे जगवा'' हा संदेश आणि याबरोबरच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' तुकोबाचा हा संदेश देण्यासाठी विद्यापीठ स्तरीय 'वृक्ष दिंडी' चे आयोजन करण्यात आले. यामध्ये वर्तमान परिस्थिती आणि भवियासाठी झाडे किती महत्वाचे आहे याचे म्हणी व घोषणानं व्दारे आणि चित्राचे सादरीकरण करत शहरातुन फेरी काढुन लोकांना संदेश देण्यात आला. यामध्ये गो. से.अर्थवाणिज्य सत्र २०१९-२० हय वर्षात महाविद्यालयाचे 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाचे ७२ स्वयंसेवकांनी समर इन्टरशिप कार्यात सहभाग नोंदविला तसेच विविध महाविद्यालयाच्या वतीने 'वृक्ष दिंडी' काढण्यात आली व या वृक्षदिंडीच्या मध्यमाने वृक्ष संवर्धनाचे प्रचार व प्रसार करण्यात आले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नवीन इमारतीच्या परिसरात मा. कुलगुरू डॉ. सिध्दार्थ विनायक काणे प्र- कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे तसेच विद्यापीठाचे इतर अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. केशव वाळके सर यांच्या मार्गदर्शनात वृक्ष लागवड केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी. पटले तसेच इतर कॉलेजचे कार्यक्रम अधिकारी उपस्थितीत होते. याप्रसंगी विद्यापीठ परिसरात ३०० झाडे लावण्यात आली व वृक्ष दिंडीची सांगता करण्यात आली.






## ४. जागतिक लोकसंख्या दिवस : दि. ११ जुलै २०१९ रोज गुरूवार

'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाअंतर्गत ११ जुलै ला 'जागतिक लोकसंख्या दिवस' साजरा करण्यात आला. यामध्ये ''वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम'', या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये निबंध स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदविला.

याचवरोवर याच दिवशी 'जागतिक तंबाखु निषेध दिवस' साजरा करण्यात आला. यामध्ये तंबाखू जन्य पदार्थाचे वाईट परिणाम समजावून सांगण्यात आले आणि तंबाखू ला सेवन न करावे यासाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. यामध्ये प्राचार्य डॉ.एन.वाय.खंडाईत व डॉ. निता धर्माधिकारी, डॉ. नेहा कल्याणी आणि इतर शिक्षकवर्ग सहभागी झाले.







## ५. PFMS कार्यशाळेमध्ये सहभाग :-

दि. ११ जुलै २०१९ ला विद्यापिठामध्ये PFMS प्रशिक्षण कार्यशाळा चे आयोजन करण्यात आले. यामध्ये Public Financial Management System या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षणाकरीता दिल्ली येथुन शासनाच्या वतीने नियुक्त केलेले प्रशिक्षक आलेले होते. सदर कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले आणि अकाउंट श्री राहुल खानोरकर सहभागी झाले होते.



## ६. निर्माण संस्थेच्या स्वयंसेवकांव्दारे मार्गदर्शन :-

निर्माण सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांव्दारे महाविद्यालयातच एन.एस.एस. विभागाला भेट देण्यात आली दि. १५ जुलै २०१९ ला महाविद्यालय परिसरात 'निर्माण सामाजिक संस्था' गडचिरोली, श्री स्वप्नील बोरखेडी व कु. पुजा टोंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रत्येक विद्याथ्याने थोडा वेळ समाजकार्याला दयावे असे आव्हाण विद्यार्थ्यांना केले तसेच निर्माण संस्था, गडचिरोली द्वारे आयोजित सात दिवसीय शिवीरामध्ये सहभागी होण्यासाठी आव्हान करण्यात आले.

## ७. नविन रासेयो स्वयंसेवकाची नोंदणी :-

राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये नविन रासेयो स्वयंसेवकाची नोंदणी कार्यक्रम दि. १६ जुलै २०१९ रोज मंगळवार ला रितसर सुरूवात करण्यात आली. रासेयो नोंदणी प्रक्रियेसाठी १५ दिवस ठेवण्यात आली आणि यामध्ये २०० नविन विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. या कार्यात जुन्या सर्व स्वयंसेवकानी नविन स्वयंसेवकाचे मार्गदर्शन केले. व राष्ट्रीय सेवा योजना विभागात नाव नोंदविण्यास प्रेरित केले. हे कार्य अतिशय उत्कृठ पणे पार पाडण्यात आले. यामध्ये नवीन रासेयो स्वयंसेवकाचा उत्साह मोठया प्रमाणात दिसुन आला.





## ८. स्वच्छ भारत समर इंटरन्शिप वकृत्व स्पर्धा : दि. १७ जुलै २०१९ रोज बुधवार :-

स्वच्छ भारत समर इंटरन्शिप च्या अंतर्गत महाविद्यालयात वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी वकृत्व स्पर्धे मध्ये भाग घेतला आणि ग्रंथालयामध्ये स्वच्छता कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी ग्रंथपाल डॉ. पी. एम. पराडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व स्वच्छतेचे महत्व पटवून दिले.







## ९. I Clean Nagpur :- दि. २१ जुलै २०१९ रोज रविवार

स्वच्छ भारत समर इंटरशिप अंतर्गत "I Clean Nagpur" या सामाजिक संस्थे सोबत महाविद्यालयीन १५ रासेयो स्वयंसेवकांनी दर रविवारला "I Clean Nagpur" या संस्थेसोबत कार्य केले. व हे कार्य रासेयो स्वयसेवक वर्षभर करतात. व स्वच्छतेचा संदेश देण्यात आला.





## १०. 'पर्यावरण संरक्षण' :- दि. २३ जुलै २०१९ रोज मंगळवार


या दिवशी 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाअंतर्गत 'पर्यावरण संरक्षण' विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हयाप्रसंगी रासेयो स्वयंसेवक मोठया प्रमाणात उपस्थित होते.





## ११. कारगिल विजय दिवस : दि. २६ जुलै २०१९ रोज शुक्रवार

'कारगिर विजय दिवस' या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम जगावे आणि भारतीय सैनिकांसाठी संवेदना वाढाव्या, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम वाढावे, हया उद्देशाने 'स्मृति टॉकीज' मधे सकाळी ९ ते १२ वाजता रासेयो स्वयंसेवकांना 'उरी सर्जिकल स्ट्राईक' हा चित्रपट दाखविण्यात आला. यात NSS चे १०० विद्यार्थी सहभागी होते.




## १२. नविन भावी मतदारांची नोंदणी :- दि. २७ जुलै ते २ ऑगस्ट २०१९

नविन मतदाराची नोंदणी कॅम्प 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाने वतीने अतिशय जबाबदारीने पार पाडण्यात आले. आणि १८ वर्षावरील विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेण्यात आली. यामध्ये डॉ. ए.वी.पटले यांनी उत्साह वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले. सदर मतदार नोंदणी कॅम्प महाविद्यालयात ६ दिवस राबविण्यात आले. रा.से.यो. स्वयं सेवकांनी अतिशय स्फुर्ती आणि उत्साहाने नविन मतदारांची नोंदणी करून घेतली 'एक कार्य-देश हिता साठी' हा संदेश देण्यात आला.



## १३. मार्गदर्शन आणि नियोजन सभेचे आयोजन :- दि. ३० जुलै २०१९ रोज मंगळवार

या दिवशी सर्व नविन स्वयंसेवकांसाठी मार्गदर्शन व वार्षीक नियोजन सभेचे आयोजन करण्यात आले. NSS काय आहे? आणि हे Unit कशा प्रकारे कार्य करते? हे पूर्णपणे मार्गदर्शन PPT व्दारे सादर करण्यात आले आणि नवीन रासेयो स्वयंमसेवकांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्यांच्या सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यात आले. आणि वार्षीक कार्यक्रमाची माहीती देवून नियोजन सांगण्यात आले. यामध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.वी. पटले आणि प्रा. डॉ. राशी अरोरा, डॉ. वाय. एच. केदार, डॉ. बी. चचाने, डॉ. एस. आर. पांडे, डॉ. प्रिया मुरारकर, प्रा. पल्लवी श्रीवास्तव व इतर शिक्षक गण उपस्थिती होते.





## १४. युवा माहिती दुत कार्यक्रम :- दि. ९ ऑगस्ट २०१९ रोज शुक्रवार

''भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या लोकोपयोगी सरकारी योजना'' ची माहिती घराघरामध्ये पोहचली पाहिजे, ती माहिती प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचली पाहिजे. यासाठी 'युवा माहिती दुत कार्यशाळा' घेण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. ह्यामधून स्वयंप्रेरणेने राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकूण ५५ विद्यार्थ्यांनी माहिती दुत म्हणून कार्ये केले. व 'एक हात देशसेवेसाठी हा संदेश' मनात वाळगुन सरकारच्या योजना घरोघरी पोहचविण्याचे कार्ये केले.




## १५. 'जागतिक शांती दिवस' :- दि. ६ ऑगस्ट २०१९ रोज मंगळवार

गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा विभागाने कॉलेजमध्ये (Caampaingn Again Nuclear Weapon Day) हा दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना Nuclear Weapon चे भीषण परिणाम काय होऊ शकतात. त्यांना जपान चे उदाहरण देऊन विस्तारपणे सांगीतले, यापुढे अशी घटना घडायला नको यासाठी सर्वांनी याच्या विरोधात सदैव उभे राहू असे सर्वांनी आव्हान केले. यावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक लखनलाल रामटेके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.ए. बी.पटले यांनी मार्गदर्शन केले आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शांततेचा संदेश दिला. या कार्यक्रमा मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा चे १५० विद्यार्थी सहभागी झाले होते.







## १६. उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार कार्यक्रमामध्ये सहभाग :-

**गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका कुमारी रूची प्रिया दत्ता हिला विद्यापीठ स्तरीय उत्कृष्ठ स्वयंसेवकाच्या पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले.** यामध्ये विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. केशव वाळके, महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले आणि महाविद्यालयाचे अन्य शिक्षक उपस्थित होते. या पुरस्कार वितरीत सोहळ्यामध्ये कुमारी रूची प्रिया दत्ता हिला प्रभारी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी तिने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक असतानाचे आपले अनुभव व मनोगत व्यक्त केले. या पुरस्कार सोहळ्यामध्ये महाविद्यालयाचे रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित राहुन कुमारी रूचीप्रिया दत्ता वर शुभेच्छांचा वर्षाव केला. आणि कामगिरी बघुन सर्व प्रोत्साहित झाले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले उपस्थित होते.





## १७. जागतिक युवा दिवस कार्यक्रम :- दि. १२ ऑगस्ट २०१९ रोज सोमवार

गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'जागतिक युवा दिवस' कार्यक्रम साजरा करण्यात आला. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले उपस्थित होते. आणि त्यांनी तरूनांना त्या दिवशी नवे आव्हाने स्विकारण्याची प्रेरणा दिली. प्रत्येक विद्यार्थ्याने आव्हानाचा सामना अतिशय ठामपणे करायला सांगीतले त्याचसोबत देशाचे हितासाठी कार्य करावे, देशाला कुठल्याही प्रकारे हानी होईल असे कृत्य करू नये असे आव्हान केले. या बरोबरच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक लखन रामटेके याने "देश निर्माण मध्ये युवकांची भूमिका" काय आणि वर्तमान परिस्थितीची जाणिव करून आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाची सांगता सिध्दार्थ सहानी यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.





## १८. स्वातंत्र दिवस कार्यक्रम :- दि. १५ ऑगस्ट २०१९ रोज गुरूवार

'स्वातंत्र्य दिन' १५ ऑगस्ट या दिवशी गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये सकाळी ७.४५ वाजता झेंडा वंदन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत सर आणि सर्व शिक्षकगण उपस्थित होते. यावरोबरच शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना आणि NCC आणि महाविद्यालयाचे इतर विद्यार्थी सहभागी झाले होते.

यानंतर बजाज भवन सभागृहामध्ये स्वातंत्र दिनानिमीत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत यांनी मार्गदर्शन केले.





## १९. माहिती दूत कार्यक्रम : दि. १६ ऑगस्ट २०१९, रोज शुक्रवार

राज्यसरकार द्वारे राज्यातील जनतेसाठी अनेक लोकोपयोगी योजना राबविल्या जातात. याची माहिती राज्यातील लोकांसाठी विद्यार्थ्यांमार्फत जनतेपर्यंत पोहचण्यासाठी माहिती दूत योजना राबविली. गावा गावात योजनांची माहिती योग्य ती माहिती त्यांच्याजवळ नसते. यासाठीच गो.से. अर्थ वाणिज्य महाविद्यालया च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयं सेवकांनी हा उपक्रम हाती घेतला आणि याची माहिती घेऊन गावातील व शहरातील लोकांच्या घरोघरी जावुन योजनांची माहिती दिली. 'माहिती दूत' या उपक्रमामध्ये जवळ जवळ ५५८ जनांनी नोंदणी केली त्यापैकी ५२ विद्यार्थ्यांनी "माहिती दूत" म्हणून कार्य केले. व आपली भूमिका उत्कृष्टपणे बजावली. अशा प्रकारे सरकारच्या कार्यामध्ये योगदान दिले. त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले व शासनाकडून त्यांना डीजीटल प्रमाणपत्र देवून त्याच्या कार्याची दखल घेण्यात आली.

## २०. राष्ट्रीय सेवा योजना सभा : १९ ऑगस्ट २०१९ रोज सोमवार

गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालयामध्ये रा.से.यो. विभागातर्फे विशेष रा.से.यो. सभा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना एन.एन.एस. संबंधी जुन्या विद्यार्थ्यांना वर्तमान ज्वलंत सामाजिकप्रश्नांचा विषयावर बोलण्यासाठी सांगण्यात आले होते. त्यासंबंधी त्यांच्याकडून पूर्तता करण्यात आली ह्या प्रसंगी राजेंद्र शाहू, खुशबु डाखोले, प्रविण साखरे, विशाल शाहू, इंद्रजित मुखी, विरा कावडकर, सिध्दांत सहाणी ह्या रासेयो स्वयंसेवकांनी वर्तमान काळातील ज्वलंत सामाजिक विषयावर आपले विचार व्यक्त केले. यानंतर कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले यांनी मार्गदर्शन केले, आणि रा.से.यो. (NSS) ची संकल्पना काय आहे, देशाच्या प्रगतीमध्ये एन. एस.एस. चे कोणते योगदान आहे आणि कसे ह्यासंबंधी चे मार्गदर्शन केले. ह्याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व समिती सदस्य हे उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व्यवस्थित पार पडला.

## २१. कोल्हापूर सांगली पुरपिडीतांसाठी मदत : २२ ऑगस्ट २०१९ रोज गुरूवार :-

महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली जिल्हयातील व आजुबाजुच्या गावामध्ये महापूरामुळे अनेक कुटूंब हे उध्वस्त झाले. या मध्ये खुप प्रमाणात आर्थिक व मानवी हानी झाली.

या पुरपिडीत गरजु लोकांना मदत करण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचे रा.से.यो. विभागातर्फे मदत सामग्री गोळा करण्यात आली. यामध्ये कपडे, धान्य, आणि आर्थिक अश्या प्रकारची मदत गोळा करण्यात आली. यामध्ये प्रत्येक स्वयंसेवकाने मोठया सक्रीयतेने काम केले. महाविद्यालयात गोळा झालेली सामग्री VENIT Campus व्दारे गरजू लोकांपर्यंत पोहचवण्यात आली. व निश्चित दिनांकानंतर प्राप्त झालेली शिल्लक मदत विद्यापीठाव्दारे पुरपिडीतापर्यंत पाठविण्यात आली. ह्याप्रसंगी डॉ. ए.बी. पटले यांनी स्वयंसेवकांचा उत्साह वाढविण्याचे काम केले व प्रत्यक्ष सहभाग घेवुन सांगली, कोल्हापूर वासीयांसाठी आपले प्रेम व्यक्त केले.





## २२. स्टार्टअप नागपूर कार्यक्रम :- २३ ऑगस्ट २०१९ रोज शुक्रवार

राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे मानकापूर स्टेडीयम मध्ये नागपूर, मध्ये झालेला स्टार्टअप नागपूर या कार्यक्रमाकरीता रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते या कार्यक्रमामध्ये प्रमुख उपस्थिती म्हणुन मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडनवीस व पालकमंत्री चद्रशेखर बावणकुळे त्याचबरोबर क्रेद्रीय मंत्री नितीन जी गडकरी उपस्थीत होते. या कार्यक्रमात रा.से.यो. विदयार्थी सहभागी झाले. याचबरोबर डॉ. नेहा कल्यानी, व डॉ. एम.आर.पांडे आणि विदयार्थीनी कार्यक्रमा मध्ये उपस्थिती दर्शविली. यात आपल्या मनातील कल्पना कसी प्रत्यक्षात उतरवुन काम करता येते. आणि आपण आपल्या शहरात कसा बदल घडवुन आणू शकतो या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर ''स्वयंरोजगार'' कशा प्रकारे देशाचा प्रगती मध्ये योगदान देऊ शकतो या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.




## २३. व्यसनमुक्ती कार्यशाळा :- २३ आगस्ट २०१९ रोजी शुक्रवार.

गुरूनानक सभागृह येथे विद्यापीठ रासेयो विभाग व संबंध फाउंडेशन, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमानाने विदयापीठ स्तरीय 'व्यसन मुक्ती कार्यशाळे' चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गो.से. अर्थ वाणिज्य महाविदयालयाचे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले सर व विदयार्थी प्रतिनिधी म्हणुन इरफाना शेख आणि निकी आहेरिया हे उपस्थित होते. या व्यतिरिक्त महाविदयालयाचे इतर विदयार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते. या कार्यशाळेअंतर्गत व्यसनाचे वाईट परिणाम कसे कसे असतात. आपल्या देशात याचे प्रमाण किती ? याचा आहारी जाणारे व्यक्ती प्रत्येक वर्षा ला किती ? बळी पडणारे व्यक्ती किती? याची विस्तृत महिती पीपीटी व्दारे देण्यात आली. या व्यसनांना कसा आळा घालता येईल याचे आव्हान महाविदयालयात देण्यात आले. व यावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्कृष कार्य करावे याचे प्रोत्साहानपर मार्गदर्शन देण्यात आले. महाविद्यालयात वेगवेगळ्या कार्यक्रमाअंतर्गत व्यसनांना कसा आळा घालता येईल यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. आणि उपस्थित सर्वानी "Pledge For Life" 'शपथ' घेतली व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून अशी शपथ घेण्याचे आव्हान करण्यात आले.



## २४. व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे महाविद्यालयात आयोजन :- २४ ऑगस्ट २०१९ रोजी शनिवार

विदयापीठ स्तरावर झालेल्या व्यसन मुक्ती कार्यशाळेमध्ये जे कार्य, जे आव्हाण सर्व महाविदयालयाना देण्यात आले. त्यासंबंधी गो.से. अर्थवाणिज्य महाविदयालयात रा.से.यो विभागाने व एन.सी.सी. विभागाने कार्य केले व सर्व विदयार्थीची विशेष सभा घेऊन व्यसनाबद्दल जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमा मध्ये जवळ जवळ २७५ विदयार्थी सहभागी झाले होते. उपस्थितीत सर्व विद्यार्थ्याकडून व्यसनमुक्तीसाठी एक 'शपथ' घेण्यात आली. आणि ''Pledge For Life'' हा संदेश देण्यात आला. सर्व विदयार्थीनी हे आव्हाण स्विकारले आणि मी व्यसन करणार आणि नाही, कोणाला करू देनार नाही, असा संदेश दिला. या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले, व रा.से.यो साहयक अधिकारी डॉ. मनोज पांडे आणि एन.सी.सी. विभाग प्रमुख प्राध्यापक आशुतोष तिवारी उपस्थित होते.




## २५. शिक्षक दिवस कार्यक्रमामध्ये सहभाग :- ५ सप्टेंबर २०१९ रोजी गुरूवार

भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म दिवस 'शिक्षक दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. भारताचे अतिशय प्रतिभावंत शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. ५ सप्टेंबर या दिवसी विद्यार्थ्यातर्फे सर्व शिक्षकांना सत्कार म्हणून एक गुलाबाचे फुल देऊन करण्यात आले याप्रसंगी काही विदयार्थानी शिक्षकां प्रती आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांचे मार्गदर्शनातुन झाली.

## २६. ''बनारस विद्यापीठाच्या विद्यार्थाचे स्वागत कार्यक्रम'' :- दि. ५ सप्टेंबर २०१९ रोजी गुरूवार

राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या १५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून गांधी विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी बनारस विदयापीठ कडून 'सायकल यात्रा' बनारस ते सेवाग्राम, करण्यात आले होते. हया बनारस विद्यापीठाच्या विद्यार्थ्याचे आणि प्राध्यापकाचे नागपूरात आगमन झाल्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या एन.एस.एस. विभागाकडून त्याचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, रासेयो संचालक डॉ. केशव वाळके, तसेच गो.से. अर्थ वणिज्य महाविद्यालयाचे एकुण ६ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. व त्यांना पुढचा मार्गासाठी प्रोत्साहान देऊन प्रस्तान करण्यात आले.



## २७. पुरपिडीत लोकांसाठी 'मदत सामग्रीचे' प्रबंधन करण्यासाठी सहभाग दि. ५ सप्टेंबर २०१९

सांगली कोल्हापुर च्या पुरपिडीत लोकांसाठी 'मदत सामग्रीचे' राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये गोळा करून विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांनी सांगली, कोल्हापूर साठी जी मदत सामग्रीची पॅकींग करण्यात आली हया कार्यक्रमामध्ये गो.से. अर्थ वाणिज्य महाविदयालयाचे रा.से. यो. स्वयंसेवक सहभागी झाले. आणि त्या पॅकींग कार्यात सहकार्य दिले.






## २८. सांगली, कोल्हापुर पुनवर्सन कॅम्पमध्ये रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग :- गावाचे नाव :- तेरवाड.

**सहभागी विदयार्थाचे नाव :-**

| | | |
|---|---|---|
| १) प्रविण साखरे | M. Com II, | (हिंदी) |
| २) रोशन मोंढे | B. Com II, | (मराठी) |
| ३) रेबंत परियार | B. Com II, | (हिंदी) |

पुनर्वसन कॅम्प चा कालावधी :- ०६/०९/२०१९ ते ११/०९/२०१९ ला घेण्यात आले व मु. तेरवाड गावातील लोकांना मदत करण्यात आली.





## २९. वोटर जनजागृती कार्यक्रम (मतदान साक्षरता) :- दि. ७ सप्टेंबर २०१९ :-

गो. से. अर्थ वाणिज्य महाविदयालया च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे मतदान साक्षरतेचा कार्यक्रम घेण्यात आला. या मध्ये प्रमुख उपस्थिती मतदार अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते. या मध्ये मतदार साक्षरता कार्यक्रम डॉ. ए.बी. पटले यांनी मतदान साक्षरतेवर जनजागृती निर्माण होण्यासाठी मार्गदर्शन केले. यामध्ये रा.से.यो. चे ४० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

## ३०. Say No to Plastic सप्ताह चे आयोजन :-

### अ) ९ सप्टेंबर २०१९ रोजी सोमवार "प्लॅस्टिक चा वापर थांबवा" (Say No to Plastic)

'प्लास्टिक चा निषेध' या विषयावर दि. १६/०९/२०१९ ला अंबाझरी गार्डनच्या शेजारी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जगजागृती व्हावी म्हणून महाविद्यालयात दोनदा या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. ह्याप्रसंगी Gem Enviren Manegement Ltd. दिल्ली चे कार्यक्रम आयोजक श्री अशोक पारेख यांनी कार्यक्रमाची पार्शभूमी समजावुन सागितली. व प्लॅक्टीकचा उपयोग करू नका असे आव्हान केले.











### ब) प्लॉस्टीक बंदी या विषयावर Poster Making Workshop चे आयोजन :-





### क) कार्यक्रमाचे आयोजन :- १४ सप्टेंबर २०१९ रोजी शनिवार

Say No to Plastic (प्लॉस्टीक चा निषेध) १६/०९/२०१९ ला कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या रा.से.यो. स्वयं सेवकांची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये Say No to Plastic या कार्यक्रमा बद्दल विस्तृत माहीती डॉ. ए. बी. पटले यांनी सांगीतले. या प्रसंगी GEM संस्थेचे कार्यक्रम संयोजक श्री अशोक पारीक आणि अमरजित सिंग यांनी उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




### ३१. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस :- २४ सप्टेंबर २०१९ रोजी मंगळवार :-

राष्ट्रीय सेवा योजनाच्या ५० व्या वर्धापण दिनानिमीत्त गो.से. अर्थवाणिज्य महाविदयालया च्या रा.से.यो. विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये रा.से.यो. च्या सर्व विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत आणि रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए. बी. पटले होते. या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. विभागाचा स्वयंसेवक शुभम चापले याला राज्य स्तरावरील उत्कृठ स्वयंसेवकाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या बद्दल प्राचार्यांद्वारे रा.से.यो. स्वयंसेवकांचा सत्कार समारंभ साजरा करण्यात आला याप्रसंगी प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांनी रा.से.यो. विभागाच्या कामाची प्रशंसा केली. महाविदयालयात राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या १५० व्या जयंती वर्षानिमीत्य विदयार्थानी गांधीजीचे विचार मांडले आणि पथनाटयाच्या व्दारे समाजात आपल्याला गांधीजीचे विचार कोणत्या प्रकारे रूजविता येतील यांचे मार्गदर्शन केले. राज्य स्तरीय पुरस्काराचे मानकरी शुभम चापले यांनी आपले अनुभव आणि रा.से.यो. चा प्रवास एका सामान्य विदयार्थ्या पासून राज्यस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवकांपर्यंतचा प्रवास सांगितला आणि रा.से.यो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.





## ३२. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्य वर्षभरात करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा अहवाल :-

१) ०२ ऑक्टोबर, २०१८ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कु. निरंजना आणि पुजा इसपांडे या विद्यार्थिनींनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व श्री. लालबहादूर शास्त्री यांच्या महान जीवन कार्याचा परिचय करून दिला. शिवम खरे, आदर्श, मिनाक्षी मेगरे आणि ओम यांनी गांधीजींना आवडणारी भजने सादर केलीत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. वाय. खंडाईत, आय.क्यू.ए.सी.कन्व्हेनर प्रा. प्रवीण यादव आणि ग्रंथपाल डॉ. पी. एम. पराडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कले. कार्यक्रमाचे संचालन समिती संयोजिका डॉ. रंजना शाहू यांनी केले. ग्रंथालयात राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले एन.एस.एस. आणि एन.सी.सीच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला. ४८ विद्यार्थी सर्वोदय आश्रम तर्फे आयोजित शिबिरामध्ये सहभागी झालेत.

२) नोव्हेंबर २०१८ स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाविद्यालयातील एन.एस.एस च्या विद्यार्थ्यांद्वारे महाविद्यालयात आणि शहरातील इतर भागात प्रत्येक रविवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

३) डिसेंबर २०१८ महाविद्यालयातील एन.एस.एस. युनिटच्या अंतर्गत दत्तक घेण्यात आलेल्या नागाझरी या गावात विद्यार्थ्यांना सत्याचे प्रयोग आणि हिंदस्वराज्य या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. गावामध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत दररोज स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. पथनाट्याद्वारे स्वच्छतेचा आणि व्यसनमुक्तीचा संदेश पोहचवण्यात आला. त्यासोबतच नागाझरी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाचे मह-त्व समजावून सांगितले. संजीवनी वृध्दाश्रमाला भेट देऊन वृध्दांची आस्थेने चौकशी करून समस्या जाणून घेण्यात आल्या.

४) ३० जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्य 'साऊथ आफ्रिकासे हे राम तक' ह्या थिमवर भित्तिपत्रक स्पर्धा घेण्यात आली. त्यात रक्षित चौरसिया प्रथम, आकांक्षा मेश्राम द्वितीय, प्रीती सिंग तृतीय आणि प्रियंका मन्ना प्रोत्साहनात्मक पुरस्कार देण्यात आले. त्यासोबतच महात्मा गांधीजीच्या आवडीच्या भजनांचा कार्यकम विद्यार्थ्यांनी सादर केला. 'गांधी विचारांची आजच्या युगात प्रासंगिकता' या विषयावर वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली.

५) फेब्रुवारी २०१९ 'गांधीजींचे शैक्षणिक विचार' या विषयावर निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पुजा कनोजिया प्रथम, खुशबू डाखोळे द्वितीय, सीमा शर्मा तृतीय पुरस्काराचे मानकरी ठरले. पुस्तक समीक्षा स्पर्धा घेण्यात आली. सर्वोदय आश्रमतर्फे आयोजित कस्तुरबा सत्याग्रह आणि रचनात्मक कार्यातील सहभाग या विषयावर झालेल्या परिसंवादात १५ विद्यार्थी सहभागी झालेत.

६) मार्च २०१९ राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या जीवनावर उपलब्ध असलेल्या आणि गांधीजींनी लिहिलेल्या पुस्तकांची ग्रंथालयासाठी खरेदी करण्यात आली.

७) एप्रिल महिन्यात महाविद्यालयातील फिल्म सोसायटी अंतर्गत 'गांधी' चित्रपट दाखविण्यात आला. सर्वोदय आश्रमतर्फे आयोजित राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी यांच्या १५० व्या जंयती समारंभात १५ विद्यार्थी सहभागी झालेत.

८) जुलै २०१९ एन.एस.एस. आणि एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसराची आणि ग्रंथालयाची स्वछता केली.

९) ऑगस्ट २०१९ महाविद्यालयातील ३० विद्यार्थींनी विश्वमांगल्य सभेतर्फे आयोजित व्यक्तिमत्व विकास या कार्यशाळेत सहभागी झाल्या. सर्वोदय आश्रम,नागपूर तर्फे आयोजित 'वर्तमान सामाजिक संदर्भात गांधी प्रणीत स्त्री' या विषयावर झालेल्या परिसंवादात ८ विद्यार्थी सहभागी झाले.

१०) सप्टेंबर २०१९ गांधी रिसर्च फाऊंडेशन तर्फे 'गांधी आणि लिडरशिप' या विषयावर आयोजित केलेल्या सात दिवसीय कार्यशाळेत महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी सहभागी झालेत. 'गांधी विचार परिषद' गोपुरी तर्फे आयोजित केलेल्या सात दिवसीय शिबिरात ७ विद्यार्थी सहभागी झालेत.

११) १ ऑक्टोंबर २०१९ रोजी गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव तर्फे 'गांधी विचार संस्कार परीक्षा' घेण्यात आली त्यात महाविद्यालयाचे ६७० विद्यार्थी सहभागी झालेत.

१२) २ ऑक्टोंबर २०१९ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि श्री. लालबहाद्दूर शास्त्री यांच्या फोटोला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. सचिन साहू या विद्यार्थ्याने राष्ट्रपिता महात्मा गांधीचे पर्यावरण विषयक विचार तर लखन रामटेके या विद्यार्थ्याने श्री. लाल बहाद्दूर शास्त्रीजींचे जीवन उलगडून दाखविले. त्यानंतर भजनांचा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केला. आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेचे आणि भित्तिपत्रकस्पर्धेचे पुरस्कार प्राचार्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यानंतर आय.क्यू.ए.सी. कॉरडीनेटर प्रा. प्रविण यादव, ग्रंथपाल डॉ. पी.एम. पराडकर आणि प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथालयात महात्मा गांधीजींच्या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्यांच्या हस्ते झाले. महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या प्लॅस्टीक निर्मूलन अभियानात ९० विद्यार्थी सहभागी झालेत आणि ७० विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धेत सहभाग नोंदविला. एन.एस.एस.चे विद्यार्थी प्लॅस्टीक निर्मूलन अभियानांतर्गत रॅलीमध्ये सामील झाले.

१३) विशेष शैक्षणिक कार्यक्रम सत्र २०१८-२०१९ पासून महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे बी. कॉम. भाग १ च्या भाषा अभ्यासक्रमासाठी महात्मा गांधीजींचे सत्याचे प्रयोग हे पुस्तक लावण्यात आले.

## ३३. गांधी जयंती कार्यक्रम अहिंसा रॅली चे आयोजन :- २ आक्टोबर २०१९ रोजी बुधवार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विदयापीठ स्तरावर महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंती वर्षा-निमित्त "अहिंसा रॅली" व "स्वच्छता अभियान" उत्साहपुर्ण वातावरनात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख उपस्थिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सिध्दार्थ विणायक काणे, प्र-कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. कोमावार तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. केशव वालके व कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले व अन्य महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या अहिंसा रॅलीचा मार्ग संविधान चौक-राजा बुलंदशहा चौक - बोर्ड ऑफिस व विद्यापीठ प्रशासकीय इमारत असा होता. यामध्ये आमच्या महाविद्यालयातील रा.से.यो. विभागाचे ५० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला कुलगुरू मा. डॉ. सिध्दार्थ विनायक काणे यांनी महात्मा गांधीजीच्या विचारावर प्रकाश टाकत त्यांचे विचार समाजात कसे रूजविता येतील यावर मागदर्शन केले.त्यानंतर सर्व उपस्थितीतांचे आभार रा.से.यो संचालक मा. केशव वाळके यांनी केले.

## ३४. जास्तीत जास्त मतदानासाठी जनजागृती कार्यक्रम :- दिनांक १६/१०/२०१९ रोजी बुधवार

भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार स्वीप (SWEEP) अंतर्गत ७६ पश्चिम, नागपूर च्या स्वीप समुहाद्वारे २१ आक्टोंबर २०१९ ला घेणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा मदतानासाठी जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे म्हणून मा. जिल्हा निवडणुक अधिकारी यांच्या आदेशान्वये विविध पध्दतीने जनजागृती अभियांनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या रासेयो पथकाच्या वतीने दोन वेगवेगळ्या टिम व्दारे १६ आक्टोंबर २०१९ रोजी बुधवार ला रविनगर मध्ये सी.पी.एन्ड बेरार कनिष्ठ महाविद्यालय, रविनगर शाखा येथे तसेच सेमिनरी हिल, वेटनरी कॉलेज, टी.वी टॉवर आणि सुरेन्द्रंगढ च्या क्षेत्रामधील नोडल अधिकारी डॉ. रेणूका नाफडे यांच्या मार्गदर्शनामध्ये गो.से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवका द्वारे पथनाटया व्दारे मतदान जनजागृती करण्यात आली. या प्रसंगी तेथील लोकांनी उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला. या पटनाटयाद्वारे स्वयंसेवकांनी मतदारांना जास्तीत जास्त संख्येने मतदान करण्याचा संदेश दिला व परिसरातील लोकांच्या घरोघरी जाऊन मतदानासाठी जनजागृती केली. एक सशक्त लोकाशाही स्थापनेसाठी आपल्या मताचे योग्य प्रयोग केले पाहिजे. हे भारताच्या प्रत्येक नागरीकाची जबाबदारी व कर्तव्य आहे हे त्यांना सांगण्यात आले. या कार्यक्रमा अंतर्गत उपस्थितीत नागरीकांना विधानसभेमध्ये जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले. व नागरिकांकडून मतदान करण्याची व इतरांनाही मतदानासाठी प्रोत्साहीत करण्याची शपथ घेण्यात आली.

देशाचा विकासासाठी एक जागृत आणि कर्तव्यनिष्ठ मतदाता बनण्याकरीता आव्हान करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. ए. बी. पटले आणि डॉ. नेहा कल्याणी, डॉ. मनोज पांडे, डॉ प्रिया मुरारकर, डॉ. वाय. एच. केदार व डॉ. राशी अरोरा यांनी सहकार्य केले व उपस्थिती व्दारे विदयार्थाना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांचे विशेष योगदान लाभले. तसेच सी.पी.अन्ड बेरार हायस्कुलच्या प्राचार्या श्रीमती गाडे मॅम आणि सर्व शिक्षकागणांचे तसेच पश्चिम नागपूर निवडणुक विभागातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.






## ३५. संविधान दिवस कार्यक्रम :- दि. २६ नोव्हेबर २०१९

दिनांक २६ नोव्हेबर २०१९ रोजी महाविद्यालयात रासेयो पथकाचे वतीने "संविधान दिवस" कार्यक्रम साजरा करण्यात आला. हया प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत, IQAC को-ऑर्डीनेटर प्रा. प्रविण यादव, डॉ. नीता धर्माधिकारी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून आंदराजली अर्पित केली याप्रसंगी प्राचार्य

डॉ. एन.वाय. खंडाईत यांनी मार्गदर्शन केले. प्रा. प्रविण यादव यांनी भारतीय संविधान उद्देशिका चे वाचन केले. व राष्ट्रीय एकात्मता व अखंडता व निष्ठा जपण्याची शपथ घेतली. प्रा. डॉ. ए.बी. पटले यांनी कार्यक्रमाचे संचालन आभार व्यक्त केले. ह्याच दिवशी रासेयो च्या ४६ विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित "संविधान रॅली" मध्ये सहभाग घेतला रॅलीचे आयोजन संविधान चौकापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर-विधी महाविद्यालय असे करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमात रासेयो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.






## ३६. रस्ता सुरक्षा रॅली :- दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ शनिवार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठचे रासेयो विभाग व रस्ता परिवहन प्रादेशिक कार्यालय, नागपूर (आर.टी.ओ. ऑफीस) यांच्या सयुक्त विद्यमानाने आयोजीत "रस्ता सुरक्षा रॅली" मध्ये आमच्या महाविद्यालयातील रासेयो च्या २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. रस्ता सुरक्षा रॅली आर.टी.ओ. ऑफीस मधून प्रस्थान करित लॉ कॉलेज चौक, लक्ष्मीनगर चौक, चिल्ड्रन गार्डन, भोले पेट्रोल पंप व प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे रॅलीचे समापन झाले. ह्या प्रसंगी आर.टी.ओ. चे अधिकारी, रासेयो डॉयरेक्टर डॉ. केशव वालके, डॉ. ए.बी.पटले, विभागीय समन्वयक आणि विविध महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी व विधार्थी ह्या रॅली मध्ये सहभागी झाले.






## ३७. रेड रिबन क्लब अंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन :-

### (अ) एच. आय. व्हि. एड्स वर मार्गदर्शन कार्यक्रम :- दि. ३ ऑगस्ट २०१९ रोज शनिवार

एच.आय.व्ही. एड्स या गंभीर आजाराबद्दल जन जागृती निर्माण व्हावी यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने RRC (Red Ribbon Club) च्या अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. आणि यामध्ये योग्य ती माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते श्री संजय पवार आणि (जिल्हा माफ्को अधिकारी) श्रीमती तनुजा फाले तसेच मृणाल सर यांनी विद्यार्थ्यांना HIV च्या रोगाबद्दल योग्य ती माहिती दिली आणि त्याचे सर्व गैरसमज दूर केले आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांनी रोगाची तपासणी निशुःल्क करून घ्यावी असे आवाहन केले.

या कार्यक्रमामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले आणि डॉ. नेहा कल्याणी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय छान प्रतिसाद देवुन सर्व HIV Aids या गंभीर आजाराची माहिती जाणुन घेतली.







### (ब) 'एच.आय.व्ही. एड्स टेस्ट शिबिराचे आयोजन' :- ७ आक्टोंबर रोज सोमवार

गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात 'एआयव्ही एडस् ऐच्छिक फ्री टेस्टींग' शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या एन. एस. एस. व एन. सी. सी. विभागाच्या विद्यार्थांनी सहभाग नोंदवून ऐच्छिक एच.आय.व्ही. टेस्ट करून घेतली या मध्ये सिस्टर राखी येडे व श्री अमन दरवाडे (Lab technician) यानी महाविद्यालयात २२३ विद्यार्थांची एच.आय.व्ही.एड्सची टेस्ट करून घेतली. कार्यक्रमाअंतर्गत प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत तसेच डॉ. पी. एम. पराडकर, प्रा. नितीन कापगते यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे आयोजन रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले यांच्या व्दारे करण्यात आले. कार्यक्रमाच्या सफलतेसाठी डॉ. नेहा कल्याणी व डॉ. आर.एच. नगरकर यांनी सहकार्य केले. या मध्ये एकूण २२३ विद्यार्थांनी ऐच्छिक HIV Test करून घेतली व कार्यक्रमाची सांगता झाली.






### (क) जागतिक एच.आय.व्ही. एडस दिवस :- दिनांक १ डिसेंबर २०१९

दिनांक १ डिसेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात एच.आय.व्ही. एडस नियंत्रण व जनजागृती यासंबधी महिती व जनजागृतीच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आले व विद्यार्थामधे जनजागृती करण्यात आली.

### (ड) एच.आय.व्ही. एड्स जागरण सप्ताह :- दिनांक १ डिसेंबर २०१९ ते ७ डिसेंबर २०१९

एच.आय.व्ही. एडस जागरण सप्ताह अंतर्गत आमच्या महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १ डिसेंबर २०१९ ते ७ डिसेंबर २०१९ या कालावधीत करण्यात आले.

- १ डिसेंबर २०१९ ला जागतिक एड्स दिवस साजरा करून जनजागृती करण्यात आली.
- २ डिसेंबर २०१९ ला रेड रिबन्स क्लब चा अंतर्गत नाटक प्रस्तुती करण्यात आली आणि यामध्ये आमच्या रा.से.यो. ५८ स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग नोंदविला.
- ४ डिसेंबर २०१९ ला वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. आणि यामध्ये एच.आय.व्ही. एडस या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले, ह्याप्रसंगी यामध्ये प्रथम पुरस्कार सिध्दांत सहानी बी. कॉम २ (हिंदी) ह्या विद्यार्थ्याने पटकावला व व्दितीय क्रमांक प्रियंका अलोने ह्या विद्यार्थीनी ला मिळाला.
- ५ डिसेंबर ला एच.आय.व्ही. एडस वर पोस्टर मेकींग ची स्पर्धा घेण्यात आली आणि यामध्ये पोस्टर व्दारे अतिशय उत्तम समाज प्रबोधनाचे संदेश देण्यात आले. यामध्ये प्रथम पुरस्कार प्राजक्ता सोजसेर बी. कॉम १ (मराठी) विद्यार्थीनीने पटकावला व व्दितीय पुरस्कार तन्नु घाटोले ह्या विद्यार्थीनीने पटकाविला.
- ७ डिसेंबर ला जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला आणि या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून सामाजिक कार्यकर्ता श्री संजय पवार सर, श्री अभय सर आणि इंगोले सर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी.पटले सर यांनी सादर केली आणि विद्यार्थ्यांना एच.आय.व्ही. एडस बद्दल थोडक्यात माहिती सांगीतली आणि त्यानंतर प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ता मा. संजय पवार यांनी एच.आय.व्ही. एडस बद्उल अतिशय महत्वाची माहिती विद्यार्थ्यांना दिली आणि कार्यक्रमाची सांगता डॉ. पटले सरांच्या आभार प्रदर्शनातुन झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेड रिबन क्लबचे अध्यक्ष राजेंद्र साहु आणि तसेच रोशन रा. मोंढे, मंथन राऊत, रेबंत परियार, सचिन साहु, रियाज पठान, नरेंद्र सिंग यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन अतिशय उत्तम रितीने केले. व एच.आय.व्ही- एड्स निमंत्रण जनजागृती सप्ताह यशस्वीपणे पार पडला.

### (इ) रेड रिबन क्लबच्या वतीने पथनाटयाचे आयोजन :-

दिनांक २ डिसेंबर २०१९ ला महाविद्यालयात व संविधान चौकात एच.आय.व्ही. एडस विषयावर रेड रिबन क्लबच्या वतीने पथनाटयाचे आयोजन करण्यात आले. ह्या प्रसंगी महाविद्यालयाचे रेडरिबन क्लबचे सदस्य विद्यार्थी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले तसेच डॉ. नेहा कल्याणी यांच्या मार्गदर्शनात पथनाटयाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या

यशस्वीतेसाठी रेड रिबन क्लबच्या सदस्यांचा आणि रासेयो स्वयंसेवकाचा व समिती सदस्यांचा सहभाग लागला.






### (फ) सप्तदिवशीय रासेयो शिबीरात एच.आय.व्ही. जनजागृती कार्यक्रम :-

एच.आय.व्ही. एड्स जनजागृती कार्यक्रम :- दुपारी २ वाजता यामिनी लांडगे (ICTC Counsellor, Lata Mangeshkar Hospital) दिपाली नानवरकर (ICTC Counsellor) व त्यांच्या Team ने HIV- AIDS या गंभीर आजाराबद्दल स्वयंसेवकांना HIV- AIDS हा रोग होण्याची कारणे त्याच्यापासून होणारा त्रास याबद्दल माहिती सांगितली तसेच त्यापासून वाचण्याचे उपाय सांगितले कारण एकदा हा रोग झाला तर तो दूर होत नाही. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला व यासंबंधी अनेक प्रश्न विचारले. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या याप्रश्नाचे निराकरण करण्यात आले.






## ३८. WALKATHON FOR YOUR BRAIN :- दिनांक १५ डिसेंबर २०१९ रोज रविवार

'स्वस्थ भारत सशक्त भारत' यासाठी आयोजन केलेल्या WALKATHON FOR YOUR BRAIN आयोजक डॉ. चंद्रशेखर मेश्राम आणि टिम व्दारे केलेल्या WALKATHON मध्ये आमच्या महाविद्यालयाच्या रा.से.यो. स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग नोंदवला. यामध्ये ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी हया रॅलीमधे इतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व सामान्य जनतेनी खुप मोठया संख्येनी सहभाग नोंदवला व स्वस्थ भारत साठी WALKATHON मध्ये ४ कीलोमीटर चालुन संदेश दिला. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. आंबेडकर कॉलेज, स्पोर्ट्स अकेडमी ग्राउंड, दिक्षाभुमी, लक्ष्मीनगर, नागपूर येथे करण्यात आले.




## ३९. हॅप्पी स्ट्रीट कार्यक्रमाचे आयोजन :- दि. ११ जानेवारी २०२०, शनिवार

स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दि. १२ जानेवारी २०२० निमित्य राष्ट्रीय सेवा योजना व ममता फाऊंडेशन, दिल्ली यांच्या संयुक्त विदयमानाने जागातिक युवा दिवस व हॅप्पी स्ट्रीट राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापिठाच्या मैदानात साजरा करण्यात आला.

नागपूर विदयापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. गो.से. अर्थ वाणिज्य महाविद्यालयातील ३० स्वयंसेवकांनी यामध्ये सहभाग घेतला होता. महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवक सकाळी ८:०० वाजता नागपूर विदयापीठाच्या मैदानात एकत्रित झाले. सर्व विदयार्थ्यांकडून सर्वप्रथम व्यायाम करवून घेण्यात आला. त्याचबरोबर झुंबा डांसचे आयोजन करण्यात आहे होते. अतिशय मनोरंजनात्मक अशा वातावरणात विदयार्थ्यांनी उत्साहीपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाअंतर्गत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सर्व विदयार्थ्यांनी सक्रीयपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमात एकूण ६०० विदयार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विदयार्थ्यांना नवनवीन खेळांची माहिती मिळाली तसेच त्यांच्यामध्ये एक नवीन उत्साह निर्माण झाला. युवकांना स्फुर्तीदायी वातावरण प्राप्त झाले. व त्यानंतर शेवटी विदयापीठाचे कुलसचिव डॉ. निरज खटी यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करून केला अशा प्रकारे ११:३० वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.



## ४०. महिलांव्दारे वाहतुक सुरक्षा रॅलीमध्ये सहभाग (Trafic Rally) :- दि.१४ जानेवारी २०२०, मंगळवार

वाहन चालवितांना वाहतुकीचे नियमांचे पालन करणे किती आवश्यक आहे. याबद्दल विदयार्थ्यांना जागृत करण्यासाठी **Trafic Rally** चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख आयोजक श्री. विजय सिंह राठोर, श्रीमती किरण शिंदे, श्री अभिजित खरे, श्री राहुल जाधव, श्रीमती गीता सेजवाल, श्रीमती शिवज्योती भामरे, श्रीमती तृप्ती निकम, श्रीमती मोनिका राठोर, महाविदयालयाची वरिष्ठ प्राध्यापिका डॉ. निता धर्माधिकारी मॅम, डॉ. नेहा कल्याणी मॅम, तसेच महाविदयालयातील ३७ विदयार्थी उपस्थित होते. **RTO** द्वारे आयोजित या कार्यक्रमाच्या उद्देश लोकांना हेल्मेट घालून वाहन वालविण्याचे फायदे काय आसतात हे समझावून सांगणे होते. याप्रसंगी सर्व विदयार्थीनींनी हेल्मेट घालून रस्ता सुरक्षा रैली काढली होती. ही रैली **RTO office** पासून एल.ए.डी. कॉलेज पर्यंत काढण्यात आली होती. हेल्मेट घालून वाहन चालविण्याचे वेळप्रसंगी आपले प्राणही वाचू शकतात असा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्यात आला.





## ४१. रस्ता सुरक्षा जन जागृती अभियान कार्यशाळेचे आयोजन :- दि. १० फेब्रुवारी २०२०, सोमवार

रस्ता सुरक्षा अभियानासाठी आयोजित कार्यक्रमात जनआक्रोश या संस्थेतील श्री. भिसे सर, श्रीमती भिसे मॅम, राव सर हे प्रमुख पाहूणे उपस्थित होते. तसेच महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. ए.बी. पटले सर, नेहा कल्याणी मॅम, राशी अरोरा मॅम, मेहता मॅम, श्री केदार सर इत्यादी शिक्षकगण उपस्थित होते. या कार्यक्रमात जनआक्रोश या संस्थेतील श्री सुरेश सहारे सरांनी रस्त्यावर वाहन चालवितांना निष्काळजी पणामुळे होणाऱ्या अपघातांवद्दल माहिती सांगितली. त्यांनी विविध विडीयोच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमात उपस्थितीत सर्वांना माहिती व्हावी की कशाप्रकारे रस्त्यावर अपघात होतात तसेच त्यांनी हे सुध्दा सांगितले की वाहनाची स्पीड नियंत्रित करता येईल येवढयाच वेगाने वाहन चालवावे. तसेच फोर व्हीलर मध्ये असतांना **Seat Belt** चा वापर फक्त चालकानेच न करता वाहनात असलेल्या सर्वांनी करावा. बाईक चालवतांना हेल्मेट वापरणे अनिवार्य हे सांगीतले जेणे करून अपघात झाल्यास डोक्याची सुरक्षा होईल त्यांनी युवकांना अत्यंत महत्वाचा संदेश दिला. त्यानंतर डॉ. नेहा कल्याणी मॅम ने सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची समाप्ती झाली.



## ४२. रक्तदान शिबिराचे आयोजन :-

दि. १८/०१/२०२० ला महाविद्यालया तील रा.से.यो पथकाव्दारे ऐच्छिक 'रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयतील ''आदर्श रक्तपेढीला'' रक्तदान करण्यात आले. ह्या रक्तदान शिबिरात ६९ विद्यार्थ्यांनी स्वंयप्रेरणेनी रक्तदान केले. ह्या प्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविदयालयातील रक्तपेढी च्या प्रमुख श्री. धर्माळे सर यांनी विदयार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व या संवधी मार्गदर्शन केले. डॉ. मनोज पांडे, प्रा. जवादे, प्रा. वाचासुंदर, श्री. सेलोकर, श्री. पंकज सर यांनी सुध्दा रक्तदान करून विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहन दिले. रक्तदान केलेल्या विद्यार्थ्यांना उत्साह वाढविण्यासाठी प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत, कार्यकम अधिकारी डॉ. ए. वी. पटले, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. राशी अरोरा तसेच डॉ. प्रिया मुरारकर, प्रा. डॉ. निता धर्माधिकारी, प्रा. पल्लवी श्रीवास्तव, डॉ. नेहा कल्याणी, प्रा. डॉ. नगरकर, डॉ. वी.एम.चचाने, डॉ.पी.एस. पराडकर, डॉ. वाय. एम. केदार व इतर प्राध्यापकांचे सहकार्य प्राप्त झाले. त्याचप्रमाणे हा कार्यक़म यशस्वी करण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.






## ४३. "एक भारत श्रेष्ठ भारत" अतंर्गत घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल :-

### १३ जानेवारी २०२०, सोमवार :-

एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात विदयार्थ्यांना ओडीसा राज्यातील संस्कृतीची तेथील खादयपदार्थांबाबत जाणिव करून देण्यासाठी विविध विडीओ दाखविण्यात आले ओडीसा मधील प्राचीन मंदीरे, तेथील नदया, जंगले, लोकजिवन इत्यादीवर आधारित विडीयो प्रोफेसर आकाश जैन यांच्याव्दारे दाखविण्यात आले. तसेच ओडिया भाषेचे महत्व व त्याच्या व्यक्तिबददल सुध्दा माहिती सांगण्यात आली. या कार्यक्रमात आकाश जैन सर, डॉ. पी.एम.पराडकर सर, डॉ.नेहा कल्याणी मॅम, डॉ.ए.वी पटेल सर, पल्लवी श्रीवास्तव मॅम, चव्हान मॅम उपस्थित होते.

### १४ जानेवारी २०२० मंगळवार :-

EBSB Club अंतर्गत विदयार्थ्यांना भरताचे माजी राष्ट्रपती व वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जिवनातील काही महत्त्व पूर्ण व प्रेरणादायी प्रसंगाचे प्रस्तूतीकरण ओडीया भाषेतील विडियोव्दारे करण्यात आले. जेणे करून ओडिया भाषा विदयार्थ्यांच्या कानावर पडावी त्यांना ती समझावी व अब्दुल कलामांच्या विडोयोतून प्रेरणा घेता यावी या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमात आकाश जैन सर डॉ. ए. बी. पटेल सर, पराडकर सर, चव्हान मॅम, नेहा कल्याणी मॅम. पल्लवी जीवास्तव मॅम इत्यादी शिक्षकगण उपस्थित होते.

### १५ जानेवारी २०२० बुधवार :-

कार्यक्रमात विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी Motivational स्पीकर श्री सुमंत टेकाडे यांना आमंत्रित करण्यात आले होते त्यांच्या बरोबर गौरी खरे मॅम, सुनंदा पांडे मॅम यांचा सहभाग कार्यक्रमाला लाभला होता या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. एन. वाय. खंडाईत, पी.एम. पराडकर, डॉ. देवयानी चव्हाण, डॉ. सोनाली गाडेकर, डॉ. निता धर्माधिकारी, डॉ. शुभांगी मोरे, डॉ.नेहा कल्याणी, डॉ. ए.बी. पटले व इतर शिक्षकगण उपस्थित होते.

सुमंत टेकाडे सरांनी विदयार्थ्यांना स्वामी विवेकानंद यांच्या जिवनातील प्रसंग सांगून विदयार्थ्यांना जिवन जगण्याची दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला विदयार्थी जिवनात ज्ञान अधिकाधिक कसे मिळवता येईल याबद्दल त्यांनी सांगितले कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्याकरिता कठीण परिश्रम करावे लागते हे त्यानी सांगितले त्यांच्या ४५ मिनीटांच्या या कार्यक्रमात त्यांनी सर्वांना खरोखर काही शिकवले. व शेवटी चव्हाण मॅम ने आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा शेवट केला.





## ➥ १६ जानेवारी २०२०, गुरूवार :-

एक भारत श्रेष्ठ भारत क्लब व्दारे विदयार्थ्यांना ओडिसा राज्याची माहिती व्हावी त्यांनी त्या राज्याबद्दल वाचावे तेथील माहिति जाणून घ्यावी त्यासाठी स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ओडीसामधील मंदिरे, तेथील संस्कृती, जंगले, खादयपदार्थ, राजकारण इत्यादी विषयांवर प्रश्न तयार केले होते. ही स्पर्धा लेखी स्वरूपात घेण्यात आली असून स्पर्धे प्रसंगी आकाश जैन सर, डॉ.चव्हान, डॉ.पी.एम.पराडकर, डॉ.ए.बी.पटले, डॉ. नेहा कल्याणी उपस्थित होते.

## ➥ १७ जानेवारी २०२०, शुक्रवार :-

विदयार्थ्यांना ओडीसातील ओडीया भाषा बोलता व लिहता यावी याकरिता ओडीसा भाषेतील बाराखडी व दररोज वापरण्यात येणारे शब्द यांची ओडीया भाषेतील Sheet विदयार्थ्यांना देण्यात आली जेणे करून ओडीया भाषा बोलायला व लिहायला सोपी व्हावी.

## ➥ १८ जानेवारी २०२० शनिवार :-

एक भारत श्रेष्ठ भरत क्लब अंतर्गत विदयार्थ्यांना ओडिया बाराखडी दिल्यानंतर शब्दांचा उच्चारण कसा करावा अंकाचे उच्चारण ओडोया भेत कसे करतात यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये विडोयोच्या माध्यमातून सर्व दाखविण्यात आले. व ओडिया भाषेत आपले नाव कसे लिहावे हे सांगण्यात आले.

## ➥ १२ फेब्रुवारी २०२०, बुधवार :-

एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत महाविदयालयात EBSB club मध्ये नोंदणी करण्याकरिता विदयार्थ्यांना नोदणी form देण्यात तसेच प्रत्येक वर्गातुन दोन विदयार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली व WhatsApp group बनविण्यात आला जेणे करून विदयार्थ्यांना ओडिसा बददल व EBSB club व्दारे कोणते कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत याबद्दल ची माहिती सहजरित्या मिळू शकेल.

## ➥ ७ मार्च २०२०, शनिवार :-

EBSB club व्दारे विदयार्थ्यांना ओडिया भाषा शिकता यावी म्हणुन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होतो. त्यामध्ये BCCA 2nd year च्या एका विदयार्थ्यान ओडिसा भाषेत स्वतःचे नाव कसे विचारावे, महाविदयालयाचे नाव कसे सांगावे अशाप्रकारचे ठेंपब प्रश्न ओडीया भाषेतून संवाद साधतांना कसे विचारायचे व त्याची उत्तरे कशा प्रकारे व्दावी हे सांगितले तो विदयार्थी मुळचा ओडीसा राज्यातील असल्यामुळे त्याला हे काम सोपविण्यात आले.





# राष्ट्रीय सेवा योजना पथक

# सप्त दिवसीय शिबीर अहवाल

### ❖ पहिला दिवस (२२ जानेवारी २०२०, बुधवार)

**अ)** सप्तदिवसीय शिबीरासाठी सर्व विदयार्थी दि. २२/११/२०२० ला गणेशपेठ बसस्थानकावरून सकाळी ११:०० ला निघाले व दुपारी १२:१५ ला शिबिर स्थळावर म्हणजेच संजीवनी वृद्धाश्रमात पोहचले सर्वांनी तिथे परिसर स्वच्छता केली व जेवण केले.

**ब)** दुपारी ४.०० वाजता ''स्वच्छ भारत अभियान'' या विषयावर महाविद्यालयाचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त माजी रासेयो स्वंयसेवक श्री. शुभम चाफले यांनी ''स्वच्छ भारत अभियान व युवकांनी भूमिका'' या विषयावर मार्गदर्शन केले.

**क)** सायंकाळी ६:०० वाजता प्रार्थना झाली. त्यानंतर रा.से.यो. चे वरिष्ठ स्वयंसेवक शुभम चाफले यांनी खेळाच्या माध्यामातुन शिबिरात असलेल्या सर्व स्वयंसेवकांचा परिचय करवून घेतला सर्वांना वेगवेगळ्या समुहामध्ये विभागले जेणे करून काम करायला सोपे व्हावे. त्यानंतर सर्वांनी रात्री ९ वाजता रात्रीचे जेवण केले व शिबिराच्या दिनचर्ये- प्रमाणे रात्री १०:०० वाजता सर्व झोपायला आपापल्या निर्धारित खोलीत गेले. अशाप्रकारे शिबिराचा पहिला दिवस संपला.




### ❖ दुसरा दिवस (२३ जानेवारी २०२०, गुरूवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली.




**ब)** सप्तदिवसीय शिबिराच्या उद्घाटनासाठी सर्व स्वंयसेवक सकाळी १०:०० वाजता शिबिर स्थळावरून नागाझरी गावातील उच्च माध्यमिक शाळेत पोहचले. तेथे शिबिराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री आशिष निनावे, आरएफओ हिंगणा यांचे हस्ते व श्री कुंदन हाते Wild life warden नागपूर जिल्हा यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री विनीत अरोरा, श्री पुरूषोत्तम शेरकुरे, तसेच मुख्याध्यापिका श्रीमती चौधरी मॅडम व इतर शिक्षक वर्ग विद्यार्थी व गावकरी मंडळी उपस्थितीत होते. श्री आशिष निनावे आणि श्री कुंदन हाते यांनी विदयार्थ्यांना वन्यप्राण्यांच्या संरक्षणाबाबत, वनाच्या संरक्षणासंबंधी मार्गदर्शन केले. व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमाने आपण वनाचे व वन्यप्राण्यांचे कसे संरक्षण करू शकतो हयाबद्दल मार्गदर्शन केले. वनसंरक्षण व वन्य प्राण्याचे संरक्षण करणे ही सुध्दा राष्ट्रीय सेवा आहे असे त्यांनी आपल्या संबोधनातुन सांगीतले.






**क) एच.आय.व्ही. एड्स जनजागृती कार्यक्रम :-** दुपारी २ वाजता यामिनी लांडगे (ICTC Counsellor, Lata Mangeshkar Hospital) दिपाली नानवरकर ( ICTC Counsellor) व त्यांच्या Team ने HIV- AIDS या गंभीर आजाराबद्दल स्वयंसेवकांना HIV- AIDS हा रोग होण्याची कारणे त्याच्यापासून होणारा त्रास याबद्दल माहिती सांगितली तसेच त्यापासून वाचण्याचे उपाय सांगितले कारण एकदा हा रोग झाला तर तो दूर होत नाही. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला व यासंबंधी अनेक प्रश्न विचारले. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे निराकरण करण्यात आले.

**ड)** सायंकाळी ४.३० ते ५.३० विद्यार्थ्यांचे बौद्धीक खेळांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ६.०० वाजता प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर ६.३० ते ८.३० वाजेपर्यंत "एक भारत श्रेष्ठ भारत" या विषयावर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर रात्री ९.०० वाजता सर्वांनी जेवण केले व रात्री १०.०० वाजता सर्व रासेयो स्वयंसेवक झोपी गेले.

## ❖ तिसरा दिवस (२४ जानेवारी २०२०, शुक्रवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली. व परिसरातील श्रमदानाचे कार्य करण्यात आले.





**ब)** सप्तदिवसीय शिबिराच्या तृतीय दिवशी सर्वांनी सकाळी संजिवनी वृद्धाश्रमातील परिसर स्वच्छ केला. त्यानंतर सकाळी ११:०० वाजता Quiz स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये सर्वाचे वेगवेगळे समुह तयार करण्यात आले व त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारल्या गेले ज्यामुळे सर्वांना खुप नविन माहिती मिळाली. १२.३० वाजता दुपारचे जेवन करण्यात आले.

**क) अवयवदान कार्यक्रम :-** दुपारी २.०० वाजता "मोहन फाऊडेशन, नागपूर" तर्फे श्री बलवंत बेहरा यांनी अवयव दानाबद्दल स्वयंसेवकांना माहिती सांगतिली त्यामध्ये त्यांनी आपण आपल्या शरीराचे कोणकोणते अवयव दान करू शकतो, जिवंत असतांना व मृत्य झाल्यानंतर अवयव दान कशाप्रकारे करता येते याची माहिती त्यांनी विदयार्थ्यांना दिली तसेच अवयव दानाबद्दल विदयार्थ्यांना असलेल्या शंका कुशंकेचे निराकरन केले.




**ड) व्यसनमुक्ती जनजागृती कार्यशाळेचे आयोजन :-** 'सलाम बाम्बे व आरोही सामाजिक संस्था, नागपूर' यांच्यातर्फे लिलाधर चरपे, सुमन मेश्राम व गोतमारे सर त्यांच्या Team ने रा.से.यो. च्या स्वयंसेवकांना तंबाकु किंवा इतर कोणत्याही व्यसनाच्या सेवनाने होणाऱ्या रोगाबद्दल माहिती पीपीटी व्दारे माहिती सांगितली, त्यांनी व्यसन मुक्तीसाठी घेतलेल्या विविध कार्यक्रमांची छायाचित्रे दाखविली तसेच व्यसन मुक्तीसाठी याप्रकारचे जागृतीकरिता रासेयो विद्यार्थ्यांनी कार्यक्रम आयोजित केल्यास त्यांची सलाम बाम्बे Team मदत करेल असे आश्वासन दिले. तसेच त्यांच्या संस्थेतर्फे विदयार्थ्यांच्या काही शंका त्यांचे जे काही प्रश्न होते ते त्यांना योग्यरित्या प्रश्नाचे निराकरन केले व कार्यक्रम संपला.







**इ)** सायंकाळी ६ वाजता प्रार्थना झाली. त्यानंतर ७.०० वाजता बौध्दीक खेळाचे आयोजन व गटचर्चा करण्यात आले. व ९.०० वाजता जेवन करण्यात आले व रात्री १०.०० वाजता विश्रांती घेण्यात आली.

## ❖ चौथा दिवस (२५ जानेवारी २०२०, शनिवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली आणि श्रमदान करण्यात आले.





**ब) आधुनिकता आणि युवापिढी :-** सप्तदिवसीय शिबिराच्या चौथ्या दिवशी योगायोगाने एका नविन अतिथिशी भेटण्याची संधी सर्वांना मिळाली. या दिवसी दुपारी १२:०० च्या दरम्यान 'अमरजी सायरे ज्युनिअर जॉनी लिवर (हास्य कलाकार) हे शिबिरात आले. यांनी हास्य अभिनेता जॉनी लिवर या कलाकाराची नक्कल करून सामाजिक प्रबोधन केले व वर्तमान वाइट गोष्टीपासून कसे स्वतःला वाढवावे याचे माध्यमातुन दर्शन केले. त्यांनी सांगीतले की, आई-वडिलांचा नेहमी आदर करावा त्यांची सेवा करावी असा मौल्यावान संदेश सर्व स्वयंसेवकांना दिला. त्यानंतर दूपारचे जेवण झाले.

**क) एक भारत श्रेष्ठ भारतचे आयोजन :-** दुपारी २:०० वाजता श्री. लकेश्वर सुर्यवंशी सर, यांचे ''एक भारत श्रेष्ठ भारत'' या विषयावर प्रबोधन झाले, ज्यामध्ये त्यांनी भारताला श्रेष्ठ बनविण्याकरिता स्वामी विवेकानंदांनी घेतलेल्या परिक्षमाबद्दल सांगितले.

**ड) गटचर्चा कार्यक्रमाचे आयोजन :-** वरिष्ठ स्वयंसेवकांद्वारे 'बेरोजगारी, भारताची ठासळत चाललेली अर्थव्यवस्था, एक भारत श्रेष्ठ भारत, इराण व अमेरिका यांच्यातील 'युद्ध' या विषयावर गटचर्चा झाली ज्यातध्ये प्रत्यकाला भेटलेल्या विषयाला विस्तृतपणे मांडण्याचा प्रयत्न केला. या माध्यमातुन सर्वांना नविन ज्ञान प्राप्त करायला मिळाले. अशा प्रकारे चौथ्या दिवशी या सर्व Activities शिबिरामध्ये संपन्न करण्यात आल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहाने सहभाग नोंदविला.





**इ)** सायंकाळी ६ वाजता प्रार्थना झाली. त्यानंतर ''राष्ट्रीय एकता व अखंडता या विषयावर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. व राष्ट्रीय गिताचा आस्वाद घेण्यात आला. व नंतर गणतंत्र दिवसाची तयारी करण्यात आली. रात्री ९ वाजता जेवन करून १० वाजता विश्रांती घेण्यात आली. व त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी स्नान करून झेंडावंदनासाठी तयार झाले.

❖ पाचवा दिवस :- (२६ जानेवारी २०२०, शनिवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली.

**ब)** संजीवनी वृद्धाश्रमात ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन :- सप्तदिवसीय शिबिराच्या पाचव्या दिवशी शिबिरात उत्साहाचे वातावरण होते कारण २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन असतो. या प्रजासत्ताक दिनानिमित्तयाने सर्व स्वयंसेवकांनी कार्यक्रमांचे आयोजन केले. संजीवनी वृद्धाश्रमात ध्वजारोहण झाले. त्याचबरोबर वृध्दाजमाचे संस्थापक डॉ. संजय उगेमुगे सरांनी व रविशकुमार सरांनी विदयार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्तव समझवुन सांगितले. त्यानंतर स्वयंसवेकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला व शेवटी उपस्थित सर्व पाहुण्यांबरोबर छायाचित्र काढुन कार्यक्रम संपला.








**क) वेळेचा सदुपयोग व युवापिढी :-** शिबिर स्थळावर कवयित्री श्रीमती ब्रम्हे मॅम, माजी आयकर अधिकारी श्री रविशकुमार सर, माजी उपजिल्हाधिकारी श्री बाम्हणकर सर, माजी लोको पायलट इंजीनियर श्री सुब्रण्यम अय्यर सर, माजी हायकोर्ट वकील श्री ॲड. गुल्हाने सर या सर्वांनी विदयार्थांना जिवनात वेळेचा सदुपयोग कसा करावा व यशस्वी होण्याकरिता संघर्ष कसे करावे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर दुपारचे जेवण झाले.

**ड)** सर्व नागाझरी गावात होणाऱ्या शिबिराच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तयारिला लागले. सायंकाळी ४:०० वाजता सर्व स्वंयसेक शिबिर स्थळावरून नागाझरी गावाला जाण्याकरिता निघाले.

**इ)** सायंकाळी ६:०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरवात झाली. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणुन महाविदयालयांचे प्राचार्य डॉ. एन.वाय.खंडाईत सर, रासेयो समितीचे सदस्य डॉ.बी. एम.चचाणे सर, प्रा. पल्लवी श्रीवास्तव मॅम, विदयापीठाचे रा.से.यो. चे ईवेंट ऑर्गनायझर शुक्ला सर. स्वनील चौरागडे सर, जिल्हा प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका चौधरी मॅम व अन्य सहकारी उपस्थितीत होते. दिपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरवात झाली. कार्यक्रमात देशभक्ती गीतावर नृत्य, ओडिया, गोंडी, मराठी इत्यादी वेगवेगळे नृत्य प्रस्तुत करण्यात आले. लघु नाटकाव्दारे गावकऱ्यांचे प्रबोधन करण्यात आले. रात्री ८:३०पर्यंत कार्यक्रम सुरू होते व रात्री ९:०० वाजता सर्व आश्रमात पोहचले. रात्रीचे जेवन करून सर्व विद्यार्थ्यांनी १०:३० वाजता विश्रांती घेतली.









## ❖ सहावा दिवस (२७ जानेवारी २०२०, सोमवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली आणि वृध्दाश्रम परिसरात श्रमदान करण्यात आले.

**ब)** सप्तदिवसीय शिबिराच्या सहाव्या दिवशी सर्व विद्यार्थी पर्यावरण सहल करण्यात आली व पर्यावरणाला समजून घेण्याचा प्रयत्न केला. पर्यावरण सहलीतुन ११:३० ला सर्व परत आले.

**क)** दुपारी शिबिराला भेट देण्याकरिता महाविद्यालयातील प्रा.विशाल ठणगन सर, डॉ. धर्माधिकारी मॅम, डॉ. चव्हान मॅम, डॉ. सोनाली मॅम, डॉ. इरानी मॅम, डॉ. मोरे मॅम, प्रा. आकाश जैन सर, डॉ. नेहा कल्याणी मॅम त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. तसेच एम.बी.ए. विभागातून डॉयरेक्टर डॉ. अश्विनी पुरोहीत, डॉ. नायडू मॅम, डॉ. देसाई मॅम यांनी शिबीराला भेट दिली. ह्या

प्रसंगी विद्यार्थ्यांनी या सप्त दिवशीय शिबीराच्या माध्यमातून केलेल्या कामाचा आढावा प्राध्यापकांना सांगीतला. रासेवो स्वयंसेवकांनी उपस्थित प्राध्यापकांसमोर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्राध्यापकांनी हया कार्यक्रमाची खुप प्रशंसा केली.

**ड)** सायंकाळी प्राध्यापिका पल्लवी श्रीवास्तव मॅम यांनी फुग्याच्या (बलुन) खेळाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना अतिशय चांगली शिकवण दिली. हया खेळातुन मॅम नी हे सांगितले की कधीही कोणतेही काम करण्याआधी सुचना लक्षपुर्वक ऐकून घेतल्या पाहिजेत त्यानंतरच कृती करावी.

**इ)** सायंकाळी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला व हया प्रसंगी सर्व स्वयंसेवकांना त्यांच्या उत्कृष्ठ कामासाठी बक्षिस देण्यात आले. अशा प्रकारे सहावा दिवस संपला. रात्रीला ९ वाजता जेवन करण्यात आले व १० वाजता सगळयांनी विश्रांती घेतली.






## ❖ सातवा दिवस (२८ जानेवारी २०२०, मंगळवार)

**अ)** सकाळी ५:०० वाजता जागर व ५.३० वाजता प्रार्थना व योगासन करण्यात आले व त्यानंतर परिसर स्वच्छता करण्यात आली. आणि श्रमदान करण्यात आले.

**ब)** संजीवन वृध्दाश्रमातील प्रबंधक श्री गोमासजी, श्री पुरुषोत्तम शेरकुरे, श्री केशवरावजी राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत रासेयो शिबीर समारोप कार्यक्रम साजरा करण्यात आला. हयाप्रसंगी रासेयो स्वयंसेवकांनी हया सप्तदिवशीय शिबीरातील आपले मनोगत व्यक्त केले. आपण या सप्तदिवशीय शिबीरातील सत्काराला अनुभव घेवुन घरी जात आहोत व त्याचा उपयोग आपल्या दैनंदिन जीवनात करू, समाजसेवा करू असे सांगीतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.बी.पटले यांनी केले व विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या सहकार्याची प्रशंसा केली व नंतर राष्ट्रगीतने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर सर्वांनी जेवन केले.

**क)** दुपारी १२:३० च्या बसने सर्व आपपल्या घरी गेले. अशा प्रकारे सप्तदिवसीय शिबिर यशस्वीरित्या पूर्ण झाला.

## ४४. जागतिक महिला दिवस कार्यक्रम दि. ८/३/२०२० :-


जगतिक महिला दिवस कार्यक्रमाचे औचित साधुन महाविद्यालयाच्या महिला सेल आणि रासेयो विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हयाप्रसंगी महाविद्यालयात कार्यरत व उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या महिलांचे पुष्पगुच्छ देवून मा. प्राचार्य डॉ.एन.वाय.खंडाईत यांनी डॉ. देवयानी चव्हाण, डॉ. शुभांगी मोरे, डॉ. रंजना साहु, डॉ. सोनाली गाडेकर, प्राध्यापिका रंगारी हयाचा करण्यात आला. तसेच उपस्थित महिलांना पुरूष प्राध्यापक वर्गाकडून पुष्पगुच्छ देवुन त्यांचे सत्कार व सन्मान करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.एन.वाय.खंडाईत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व चांगले उत्कृष्ठ कार्य करण्याचे आव्हान केले.

याच दिवशी रासेयो विभागातर्फे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे वकृत्व स्पर्धा घेण्यात आली यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले व महिलांबद्दल आदर, सन्मान करावा असे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.वी.पटले उपस्थित होते.

## ४७. कोरोना विषाणू व जनता कर्फ्यु बद्दल जनजागृती अभियान :-


महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'जागतिक कोरोना संक्रमण आपदा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये व रासेयो स्वयंसेवकांच्या माध्यमाने समाजामध्य Whatsapp, Facebook व Social मिडीयाच्या माध्यमाने जनजागृतीचे कार्य करण्यात आले.

माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरीकास संबोधीत केलेल्या जनता कर्फ्यचे आव्हानानुसार त्यांनी एनएसएस मध्ये सहभागी असणाऱ्या स्वयंसेवकांचा विशेष उल्लेख आपल्या भाषणात केला. त्यासंदर्भात आमच्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी या आव्हानाला उत्तम प्रतिसाद देवुन या आपदा मोहीमेमध्ये आपला सहयोग देवुन प्रत्येक रासेयो स्वयंसेवकांनी किमान १० व्यक्तींना फोन करून तसेच Whatsapp व्दारे व Social मिडीयाच्या माध्यमाने जनजागृती केली. व माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आव्हानाची जाणीव करून दिली तसेच दि. २२/३/२०२० रविवारला सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत कोणीही बाहेर निघु नये व इतरांनाही घराबाहेर निघु देवु नये यासाठी मोलाचे कार्य केले. तसेच याच दिवशी सायंकाळी ५ वाजता आपल्या दरवाज्यात, खिडकीत उभे राहुन टाळ्या वाजवुन, घंटी वाजवुन देश सेवेत असणाऱ्या सर्वासाठी धन्यवाद व्यक्त केले आणि आपल्या सभोवतालातील, मित्रांना इत्यादी सर्वांना मोबईलवरून त्याचे आव्हान करण्यात आले. या मोहीमीच्या यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.ए.वी.पटले यांनी Social मिडीयाच्या माध्यमाने रासेयो स्वयंसेवकांचे मार्गदर्शन केले व या कार्यात सहभागी होण्याची व कार्य करण्याची प्रेरणा दिली. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.खंडाईत यांनी रासेयो विभागाच्या कार्याची दखल घेवुन प्रशंसा केले.




★ NSS Volunteers ★

Veeradevi Kawalkar, Astik Parihar




★ NSS Volunteers ★

Jay Khapre, Lakhan Ramteke

**आभार :-**

उपरोक्त राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमीत कार्यक्रम आणि सप्त दिवसीय शिबीर यशस्वी करण्यासाठी राजेन्द्र साहु, प्रवीण साखरे, मंथन राऊत, विरा कावडकर, शिवानी मिश्रा, कुनाल भोयर, रोशन मोंढे, विशाल साहू, इंद्रजित मुखी, रेवंत परियार, खुशबु डाखोळे, तन्नू घाटोळे, मृणाली कावडकर, हर्षा वैदय, श्रध्दा गव्हाणे, आस्तिक परिहार, जय खापरे, इरफाना शेख, कृतिका गायकवाड, बालिका बोंडे, दिगंबर नागपूर, रियाझ पठान, प्रियंका अलोने, रितिक सिरभैये, निखील साखरे, दिव्या बिसेन, आकांक्षा टैभरे, निखील राऊत, मनोज उगले, सचिन साहू, सिद्धांत सहानी, अपेक्षा हुमणे, पिंकी मोहबिया, ज्योती वर्मा, दिपाली दहिकर, अंसिा उके, साक्षी तांबे, लखन रामटेके, श्वेता कैथवास यांचे सहकार्य प्राप्त झाले.

तसेच राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. राशी अरोरा, डॉ. वाय.एच. केदार, डॉ. वी. एस. चचाने, डॉ. प्रिया मुरारकर डॉ. एम.आर.पांडे, प्रा. पल्लवी श्रीवास्तव, डॉ. नेहा कल्याणी, प्रा. आकाश जैन, डॉ. पी. एम.पराडकर, प्रा. आशुतोष तिवारी, डॉ. प्रा. विशाल ठणगण यांचे सहकार्य प्राप्त झाले. मा. प्राचार्य डॉ. एन.वाय. खंडाईत यांच्या मार्गदर्शनात व निर्देशनात आणि सहकार्याने शांततेत आनंदी वातावरणात संपन्न झाले.

**धन्यवाद...!**

**दि. २५/०४/२०२०**

**संयोजक**

**डॉ. ए. बी. पटले**
**राष्ट्रीय सेवा योजना समिती**

**अध्यक्ष/ प्राचार्य**

**डॉ. एन. वाय. खंडाईत**
**राष्ट्रीय सेवा योजना समिती**